RNI No. MAHBIL /2009/31747

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग एक-ल

वर्ष १२, अंक २] शुक्रवार, जानेवारी २, २०२६/पौष १२, शके १९४७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १६.००

असाधारण क्रमांक ३

प्राधिकृत प्रकाशन

(केंद्रीय) औद्योगिक विवाद अधिनियम व मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम यांखालील (भाग एक, चार-अ, चार-ब आणि चार-क यांमध्ये प्रसिद्ध केलेल्या अधिसूचना, आदेश व निवाडे यांव्यतिरिक्त) अधिसूचना, आदेश व निवाडे.

उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १ जानेवारी, २०२६.

अधिसूचना

महाराष्ट्र सहायक उपक्रम (खास उपबंध) अधिनियम, १९५८.

क्रमांक [बीआरयु-२०२५/प्र.क्र.१२१/उद्योग-१०].— "महाराष्ट्र सहायक उपक्रम (खास उपबंध) अधिनियम, १९५८" (१९५८ चा ९६) कलम ३ चे पोट-कलम (१) आणि कलम ४ चे पोट-कलम (१) खंड (अ) उपखंड (चार) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे,–

(अ) घोषित करते की, मे. ब्लू बर्ड (इंडिया) लिमिटेड, पुणे ज्याचे नोंदणीकृत कार्यालय, ७५९/७४, प्रभात रोड, पुणे-४११ ००४ (यापुढे "सहायक उपक्रम" म्हणून संबोधीत) येथे आहे, त्यांस बेकारी निवारण्याचा एक उपाय म्हणून महाराष्ट्र सहायक उपक्रम (खास उपबंध) अधिनियम, १९५८ अन्वये दिनांक १ जानेवारी, २०२६ रोजी सुरु होणाऱ्या आणि दिनांक ३१ डिसेंबर, २०२६ रोजी संपणाऱ्या (दोन्ही दिवस धरुन) एक वर्षाच्या कालावधीसाठी "सहायक उपक्रम" असेल; आणि

(ब) असे निदेश देत आहे की, उक्त सहायक उपक्रमाच्या संबंधात आणि उक्त सहायक उपक्रम पुढील एक वर्षाच्या ज्या कालावधीत "सहायक उपक्रम" म्हणून चालू राहणार आहे त्या दिनांक १ जानेवारी, २०२६ रोजी सुरु होणाऱ्या आणि दिनांक ३१ डिसेंबर, २०२६ रोजी संपणाऱ्या (दोन्ही दिवस धरुन) एक वर्षाच्या कालावधीच्या संबंधात उपार्जित किंवा संपादित होणारे कोणतेही हक्क, विशेषाधिकार, बंधने किंवा दायित्वे [उक्त उपक्रमाच्या कामगारांसाठी, राज्य कामगार विमा महामंडळाच्या देय रकमा, कर्मचारी भविष्य निर्वाह निधी आणि संकीर्ण तरतूदी अधिनियम, १९५२ (१९५२ चा महा. अधि. क्र. १९), महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा महा. अधि. क्र.४१), महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, उपजिविका व नोकऱ्या यावरील कर अधिनियम, १९७५ (१९७५ चा महा. अधि. क्र. १६) आणि महाराष्ट्र मूल्यवर्धीत कर अधिनियम, २००२ (२००५ चा महा.

अधि. क्र.९) अन्वये उपार्जित अथवा पत्करलेली कोणतीही बंधने किंवा दायित्वे खेरीज करुन] आणि जी बंधने किंवा दायित्वे दिनांक १ जानेवारी, २०२६ पूर्वी उपार्जित अथवा पत्करलेली असतील त्यांच्या अंमलबजावणीसाठी असलेली कोणतीही उपाययोजना निलंबित केली जाईल आणि कोणतेही न्यायालय, न्यायाधिकरण, अधिकारी किंवा प्राधिकरण यांच्यापुढे असलेली त्यांच्या संबंधातील सर्व कार्यवाही स्थगित केली जाईल.

तथापि, राज्य शासनाने महाराष्ट्र सहायक उपक्रम (खास उपबंध) अधिनियमाच्या अनुषंगाने सुधारणा अथवा निर्णय घेतल्यास ते संरक्षण कालावधीमध्ये राबविणे हे घटकास अनिवार्य असेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

अजित सासुलकर,
शासनाचे उप सचिव.

INDUSTRIES, ENERGY, LABOUR AND MINING DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated 1st January, 2026.

NOTIFICATION

THE MAHARASHTRA RELIEF UNDERTAKINGS (SPECIAL PROVISIONS) ACT, 1958.

No. [BRU-2025/CR.121/Ind.10].— In exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 3 and sub-clause (*iv*) of clause (*a*) of sub-section (*1*) of section 4 of the The Maharashtra Relief Undertakings (Special Provisions) Act (XCVI of 1958), the Government of Maharashtra hereby,—

(*a*) declares that, the industrial undertaking called "M/s Blu Bird (India) Limited, having its registered office at 759/74, Prabhat Road, Pune-411 004 (hereinafter referred to as "the said relief undertaking"), shall, for a period of one year commencing on the dated 1st January, 2026 and ending on the dated 31st December, 2026 (both days inclusive), be conducted to serve as a measure of preventing unemployment; and

(*b*) directs that, in relation to the said relief undertaking and in respect of the said period of one year commencing on the dated 1st January, 2026 and ending on the dated 31st December, 2026 (both days inclusive), for which the said relief undertaking continues as such, any rights, privileges, obligations or liabilities [except the obligations or liabilities incurred in favour of workmen of the said relief undertaking, the dues of the Employee's State Insurance Corporation and any liabilities incurred under the Employees Provident Fund and Miscellaneous Provisions Act, 1952 (19 of 1952), the Maharashtra Land Revenue Code, 1966 (Mah.XLI of 1966), the Maharashtra State Tax on Professions, Trades, Callings and Employments Act, 1975 (Mah. XVI of 1975) and the Maharashtra Value Added Tax Act, 2002 (Mah. IX of 2005)], accrued or incurred before the dated 1st January, 2026 and any remedy for the enforcement thereof shall be suspended and all proceedings relating there to pending before any court, tribunal, officer or authority shall be stayed :

Provided that, the said relief undertaking shall adopt all necessary reforms mandatorily as decided by the State Government during the relief undertaking period.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

AJIT SASULKAR,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.